महासमादेशकांचे कार्यालय, होमगार्ड, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवरील एकूण ४०३ अस्थायी पदांना मुदतवाढ मिळणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक : एचजीएस-२०१८/प्र.क्र.०१/विशा-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : १७ मार्च, २०१८

वाचा:- १) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : पदनि-२०१६/प्र.क्र. ८/१६/आ.पु.क., दिनांक ०५.०३.२०१८
२) गृह विभाग, शासन निर्णय क्र. एचजीएस २०१८/प्र.क्र. ०१/विशा-८, दि. २९.०१.२०१८
३) महासमादेशकांचे कार्यालय, होमगार्ड, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. मस/कार्या-२/अस्थायी/२०१८/७९२, दिनांक २७.०२.२०१८

प्रस्तावना :

महासमादेशकांचे कार्यालय, होमगार्ड, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवरील एकूण ४०३ अस्थायी पदांना दि. ०१.०१.२०१८ ते दि. २८.०२.२०१८ पर्यंत संदर्भ क्रमांक २ येथील शासन निर्णय दि. २९.०१.२०१८ अन्वये मुदतवाढ देण्यात आली होती. सदर मुदतवाढ दि. २८.०२.२०१८ रोजी संपली आहे. वित्त विभाग, शासन निर्णय, दि. ०५.०३.२०१८ अन्वये आकृतीबंधात समाविष्ट असलेल्या अस्थायी पदांना तसेच, यापूर्वी आढावा मंजूर केल्यानंतर निर्माण करण्यात आलेल्या परंतु ज्यांचा समावेश आकृतीबंधात करण्यात आलेला नाही, अशा अस्तित्वात असलेल्या सर्व अस्थायी पदांना दिनांक ०१.०३.२०१८ ते दि. ३०.०९.२०१८पर्यंत मुदतवाढ देण्याचे अधिकार प्रशासकीय विभागांना देण्यात आले आहेत. तसेच दि. ३०.०९.२०१८ पूर्वी कोणत्याही परिस्थितीत कार्यालयांच्या आस्थापनेवरील मंजूर पदांचा आढावा घेऊन, सुधारित आकृतीबंधास उच्चस्तरीय समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. या अटीच्या अधीन राहून महासमादेशकांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयातील एकूण ४०३ अस्थायी पदांना दिनांक ०१.०३.२०१८ ते दि. ३०.०९.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्याची बाब विचाराधीन होती. त्यास अनसरुन सदर प्रकरणी शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :-

महासमादेशकांचे कार्यालय, होमगार्ड, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयातील सोबतच्या प्रपत्रात नमूद एकूण ४०३ अस्थायी पदांना दि. ०१.०३.२०१८ ते दि. ३०.०९.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

दि. ३०.०९.२०१८ पूर्वी सुधारीत आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेणे आवश्यक असल्याने सुधारीत आकृतीबंधाचा प्रस्ताव शासनास तात्काळ सादर करण्याची दक्षता नागरी संरक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयाने घ्यावी.

२. या पदांवर होणारा खर्च मागणी क्र.१ मुख्य लेखा शिर्ष "२०७०-इतर प्रशासनिक सेवा (१०७) होमगार्ड ०१ वेतन" या लेखाशिर्षाखाली वर्ग करण्यात यावा व सदरचा खर्च वित्तीय वर्षासाठी मंजूर अर्थसंकल्पिय अनुदानातुन भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय वित्त विभाग क्रः पदनि-२०१६/प्र.क्र. ८/१६ आ.पु.क., दिनांक ०५.०३.२०१८ अन्वये अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याबाबत प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्यांचा संकेताक क्र. २०१८०३१७१६१८१७७३२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Deepak Vasant Sawant

Digitally signed by Deepak Vasant Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=43cdfecb6fd26ff7b1b970520962ebf72d86546b92151214820b2bb31f3ccac8, serialNumber=66ea8e25496abe127ddbfd3157e10ae5a1fb12e738b63f8a5b2cb92885fd1f05, cn=Deepak Vasant Sawant
Date: 2018.03.17 16:28:29 +05'30'

(दि. व. सावंत)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत : प्रपत्र-अ

प्रत:

१) महासमादेशक, होमगार्ड, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई.
३) महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई.
४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
६) वित्त विभाग, आ.पु.क., मंत्रालय,मुंबई.
७) निवड नस्ती, विशा-८ कार्यासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

शासन निर्णय, गृह विभाग क्र.एचजीएस-२०१८/प्र.क्र.०१/विशा-८, दिनांक १७ मार्च, २०१८

सोबतचे विवरणपत्र

प्रपत्र - अ

महासमादेशक होमगार्ड-महाराष्ट्र राज्य,मुंबई मुख्यालय

अ.क्र.	पदाचे नाव	गट	मंजूर पदे	वेतनश्रेणी
			अस्थायी	
१	वरिष्ठ प्रशासिक अधिकारी	**गट-अ**	१	१५६००-३९१०० , ग्रेड पे ६६००
२	कनिष्ठ प्रशासिक अधिकारी,	**गट-ब**	१	९३००-३४८००, ग्रेड पे ४४००
३	सहाय्यक लेखा परीक्षक (वित्त व लेखा)		१	९३००-३४८००, ग्रेड पे ४४००
४	प्रमुख लिपिक	**गट-क**	१	९३००-३४८००, ग्रेड पे ४२००
५	वरिष्ठ लिपिक		२	५२००-२०२००, ग्रेड पे २४००
६	लिपिक टंकलेखक		४	५२००-२०२००, ग्रेड पे १९००
७	पोलिस कॉन्स्टेबल		२	५२००-२०२००, ग्रेड पे १८००
८	शिपाई नाईक	**गट-ड**	१	४४४०-७४४०, ग्रेड पे १६००
९	शिपाई		३	४४४०-७४४०, ग्रेड पे १३००
१०	स्वच्छक		१	४४४०-७४४०, ग्रेड पे १३००
	एकूण		**१७**	

<u>समादेशक,मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,घाटकोपर,मुंबई</u>

अ.क्र.	पदांचे नाव	गट	मंजूर पदे	वेतनश्रेणी
१	लिपिक टंकलेखक	**गट-क**	१	५२००-२०२००, ग्रेड पे १९००
२	भांडारपाल		२	५२००-२०२००, ग्रेड पे १९००
३	प्रदर्शक		७	५२००-२०२००, ग्रेड पे २४००
४	सफाईगार	**गट-ड**	१	४४४०-७४४०, ग्रेड पे १३००
५	धोबी		१	४४४०-७४४०, ग्रेड पे १६००
६	आचारी		२	४४४०-७४४०, ग्रेड पे १६००
७	माळी		१	४४४०-७४४०, ग्रेड पे १३००
८	क्वार्टरगार्ड सैनिक		१	४४४०-७४४०, ग्रेड पे १६००
	एकूण		**१६**	

समादेशक , होमगार्ड-बृहन्मुंबई

अ.क्र.	पदांचे नाव	गट	मंजूर पदे	वेतनश्रेणी
१	निदेशक	**गट-क**	१२	५२००-२०२००, ग्रेड पे २४००
२	हेड कॉन्स्टेबल		१	५२००-२०२००, ग्रेड पे १८००
३	कॉ.आर्मोरर		१	५२००-२०२००, ग्रेड पे १८००
४	पोलिस कॉन्स्टेबल		१	५२००-२०२००, ग्रेड पे १८००
५	कॉ.चालक		१	५२००-२०२००, ग्रेड पे १९००
६	प्रशिक्षित आर्मोरर हवालदार		१	५२००-२०२००, ग्रेड पे १८००
	एकूण		**१७**	

सर्व जिल्हा समादेशक, होमगार्ड कार्यालयातील पदे

अ.क्र.	जिल्हा समादेशक कार्यालये (33 जिल्हे)	गट	मंजूर पदे	वेतनश्रेणी
१	प्रशासिक अधिकारी	**गट-क**	२५	९३००-३४८००, ग्रेड पे ४३००
२	प्रमुख लिपिक		८	५२००-२०२००, ग्रेड पे २४००
३	वरिष्ठ लिपिक		९	५२००-२०२००, ग्रेड पे २४००
४	कनिष्ठ लिपिक		१०	५२००-२०२००, ग्रेड पे १९००
५	चालक		८	५२००-२०२००, ग्रेड पे १९००
६	केंद्र नायक		३३	९३००-३४८००, ग्रेड पे ४३००
७	पलटन नायक		३३	९३००-३४८००, ग्रेड पे ४२००
८	सामग्री प्रबंधक सुभेदार		२९	५२००-२०२००, ग्रेड पे २८००
९	हवालदार निदेशक		१२४	५२००-२०२००, ग्रेड पे २४००
१०	हवालदार लिपिक		३३	५२००-२०२००, ग्रेड पे १९००
१	सैनिक	**(गट-ड)**	४	४४४०-७४४०, ग्रेड पे १६००
२	शिपाई		३७	४४४०-७४४०, ग्रेड पे १३००
			३५३	

होमगार्ड संघटनेतील अस्थायी पदांचा गोषवारा

अ.क्र.	संवर्ग	मंजूर पदे
१	गट-अ	१
२	गट-ब	२
३	गट-क	३४८
४	गट-ड	५२
	एकूण	**४०३**